भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक ०८.०५.२०२१ ते १२.०५.२०२१)

| अंक ३७/२०२१ | | | | | | | दिनांक ०७.०५.२०२१ | कालावधी ५ दिवस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (३०/०४/२०२१ ते ०६/०५/२०२१ पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता ०८.०५.२०२१ ते १२.०५.२०२१ पर्यंत) | | | | |
| ३०/०४ | ०१/०५ | ०२/०५ | ०३/०५ | ०४/०५ | ०५/०५ | ०६/०५ | दिनांक | ०८/०५ | ०९/०५ | १०/०५ | ११/०५ | १२/०५ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ५ | १७ | २० | ८ | ७ |
| ३९.० | ३९.० | ३९.० | ३९.० | ३८.५ | ३८.० | ३८.० | कमाल तापमान (अं. से) | ३७ | ३६ | ३६ | ३६ | ३६ |
| २०.५ | २१.० | २२.० | २३.० | २३.० | २३.५ | २५.५ | किमान तापमान (अं. से) | २५ | २५ | २५ | २४ | २४ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) सकाळ | ५ | ४ | ७ | ६ | ५ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) दुपार | | | | | |
| ६९ | ८४ | ८४ | ९२ | ७७ | ७७ | ७७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ८० | ८० | ७९ | ७७ | ७५ |
| ४४ | ४७ | ४५ | ४४ | ५३ | ५३ | ५३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६७ | ६८ | ६१ | ६२ | ६३ |
| २.२ | २.९ | २.१ | २.० | २.१ | १.६ | २.२ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००६ | ००७ | ००६ | ००७ | ००७ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | वा-याची दिशा सकाळ | पुर्वोत्तर / ईशान्ये कडे | आग्नेय कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | ऊत्तरोत्तर/ वायव्ये कडे |
| पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | वा-याची दिशा दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०२०) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२१ पासूनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२१ पासूनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४८६०.० | २४.८ | ०.० | ०.० |

| | | |
|---|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक ०८ ते १२ मे या कालावधी दरम्यान दिनांक ८, ११ व १२ मे रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची तर दिनांक ९ व १० मे रोजी मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. कमाल व किमान तापमान स्थिर राहुन आर्द्रतेमध्ये वाढ संभवत आहे. तसेच हवामान आर्द्र व मुख्यत्वे ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| विस्तारीत श्रेणीतील हवामान अंदाज | पर्जन्यमान | दक्षिण कोकण व गोवा या हवामान उपविभागामध्ये दिनांक १२ ते १८ मे या कालावधी दरम्यान पर्जन्यमान सरासरीपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे. (सदर कालावधी दरम्यान ०.२९ मिमी एवढे सरासरी पर्जन्यमान असते तरी या वर्षी सदर कालावधी दरम्यान ०.३४ मिमी पर्जन्यमान होण्याची शक्यता आहे व ते सरासरीपेक्षा १८.२५ टक्क्यांनी जास्त होण्याची शक्यता आहे.) |
| | कमाल व किमान तापमान | दक्षिण कोकण व गोवा या हवामान उपविभागामध्ये दिनांक १२ ते १८ मे या कालावधी दरम्यान कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. (सदर कालावधी दरम्यान सरासरी कमाल व किमान तापमान अनुक्रमे ३४.९९ व २४.४४ डीग्री सेल्सीअस एवढे असते तरी या वर्षी सदर कालावधी दरम्यान ते अनुक्रमे ३४.०२ व २४.५७ डीग्री सेल्सीअस एवढे असण्याची शक्यता आहे कमाल तापमान सरासरीपेक्षा ०.९७ डिग्री सेल्सीअसने कमी व किमान तापमान सरासरीपेक्षा ०.१३ डीग्री सेल्सीअसने जास्त असण्याची शक्यता आहे.) |
| इशारा | | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक ०८ मे रोजी काही ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची तर दिनांक ०९ मे रोजी तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे असा ईशारा प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून देण्यात आलेला आहे. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | | सोसाट्याचा वारा, मेघगर्जना व विजांच्या लखलखाटाची शक्यता लक्षात घेता विजांचा अंदाज घेण्यासाठी दामिनी अँपचा वापर करावा.<br>विजांचा लखलखाट होत असताना व हलक्या स्वरुपाचा पाऊस सुरु असताना मोकळ्या चरावयास सोडलेल्या शेळ्यांच्या/मेंढ्यांच्या कळपासहित शेळी/मेंढपाळांनी झाडांचा आसरा घेऊ नये. झाडावर विज पडण्याची शक्यता असल्याने स्वतःच्या व जनावरांच्या जिवीतास दगा होण्याची शक्यता असते.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ थंड पाणी व उपलब्ध असल्यास खाण्यासाठी हिरव्या ओल्या चा-याची व्यवस्था करावी. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | | सिंधुदुर्ग जिल्ह्यात दिनांक ८ व ९ मे रोजी काही/तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा व विजांचा लखलखाटासह हलक्या स्वरुपाच्या पाउसाची शक्यता आहे. |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | पिक निहाय कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | काढणी | आंबा लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील झाडे झुडपे तोडुन जमिन स्वच्छ करावी.<br>पावसाळा सुरु होण्यापुर्वी एप्रिल मे महीन्यात १०x१० मीटर अंतरावर १x१x१ मीटर आकाराचे खड्डे खणुन ते चांगली माती आणि ३-४ घमेली कंपोस्ट किंवा शेणखत आणि ३ किलो सुपर फॉस्पेट या मिश्रणाणे भरुन तयार ठेवावेत.<br>जिल्ह्यामध्ये दिनांक ०८ व ०९ मे, २०२१ या कालावधी दरम्यान काही/तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता नविन लागवड केलेल्या आंबा कलमांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा.<br>जिल्ह्यामध्ये आंबा पिक बहूतेक ठिकाणी अंडाकृती फळे व मोठया आकाराची काढणीची फळे अशी अवस्था आहे. येत्या ५ दिवसांमध्ये दिनांक ०८ व ०९ मे, रोजी काही/तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ % (चौदा आणे) पक्वतेला लवकरात लवकर काढुन घ्यावीत.<br>फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये.<br>येत्या ५ दिवसांमध्ये दिनांक ०८ व ०९ मे, रोजी काही/तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता अपरीपक्व व काढणीस तयार न झालेल्या फळांवर पाउसामुळे करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊन डाग पडु नये व नुकसान होऊ नये यासाठी आंबा पिकावर कार्बेन्डॅझीम ५० टक्के पाण्यात विरघळणारी पावडर (१० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात) किंवा थायोफिनेट मिथिल ५० टक्के पाण्यात विरघळणारी पावडर (१० ग्रॅम प्रती १० लिटर |

| | | |
|---|---|---|
| | | पाण्यात) किंवा प्रोपिनेप ७५ टक्के पाण्यात विरघळणारी पावडर (२० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात) यापैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची गरजेनुसार फवारणी करावी.<br>फळे पिकात घालताना फळ कुजीचा प्रादुर्भाव वाढु नये यासाठी फळांना उष्ण जल प्रक्रिया द्यावी. त्यासाठी फळे ५२ अंश से. तापमानाच्या पाण्यात १० मिनीटे बुडवुन नंतर आडीत घालावीत.<br>येत्या ५ दिवसांमध्ये दिनांक ०८ व ०९ मे, रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता फळमाशीच्या नियंत्रणासाठी विद्यापीठाने विकसित केलेले मिथिल युजिनॉलयुक्त रक्षक सापळे प्रती हेक्टरी चार याप्रमाणात आंबा बागेमध्य लावावेत.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता तापमान वाढीमुळे हापुस आंबा फळांमध्ये साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. साका टाळण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर काढावीत व सावलीत ठेवावीत. ऊन्हामध्ये फळांची वाहतुक करु नये. |
| काजु | काढणी | काजुची लागवड कलमे लावुन करतात. एप्रिल किंवा मे महीन्यात ७x७ मीटर किंवा ८x८ मीटर अंतर ठेवुन खडडे खोदावेत.<br>हेक्टरी १५५-२०० झाडे बसतात. खड्ड्याची लांबी, रुंदी, खोली ०.६x०.६x०.६ मीटर असावी.<br>खड्ड्यात दीड ते दोन घमेली चांगले कुजलेले कंपोस्ट, १/२ किलो सिंगल सुपर फॉस्फेट किंवा हाडाची पुड मातीत मिसळावी.<br>वाळवी नियंत्रणासाठी २% मिथिल पॅराथिऑन ५० ग्रम भुकटी प्रति खड्ड्यात टाकावी.<br>जमिनीतील ओलावा टिकवुन ठेवण्यासाठी नवीन लागवड केलेल्या झाडांच्या अळ्यात पालापाचोळा, भाताचे तुस किंवा गवत यांचे आच्छादन करावे.<br>जिल्ह्यामध्ये दिनांक ०८ व ०९ मे, २०२१ या कालावधी दरम्यान काही/तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता नविन लागवड केलेल्या काजु कलमांना बांबुच्या काठीचा आधार दयावा.<br>येत्या ५ दिवसांमध्ये दिनांक ०८ ते १२ मे, २०२१ या कालावधी दरम्यान काही/तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता काजूमध्ये ज्या ठिकाणी काढणीयोग्य बी तयार झालेली आहे अशा ठिकाणी तयार झालेल्या बीयांची काढणी व वेचणी सकाळच्या सत्रात करुन घ्यावी व बीया उन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवाव्यात. |
| नारळ | फळधारणा | जिल्ह्यामध्ये दिनांक ०८ व ०९ मे, २०२१ या कालावधी दरम्यान काही/तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता नविन लागवड केलेल्या नारळ रोपांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा. |
| सुपारी | फळधारणा | जिल्ह्यामध्ये दिनांक ०८ व ०९ मे, २०२१ या कालावधी दरम्यान काही/तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता नविन लागवड केलेल्या सुपारीच्या रोपांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा. |
| वायंगणी भात | रब्बी भात- पक्वता ते काढणी खरिप- पुर्वतयारी | भात कापणी केलेल्या शेताची नांगरट करून धसकटे नष्ट करावीत. ज्या शेतामधील पीकांची काढणी पूर्ण झाली असेल त्या शेताची नांगरट करुन जमिन उन्हात चांगली तापू दयावी. खरीप हंगामातील पीकांच्या लागवडीच्या दृष्टीने पूर्व तयारीस लागावे. भात पीकाच्या रोपवाटीकेकरिता शेताची मशागत करावी.<br>खरीप हंगामासाठी भात, भूईमुग, नागली इ. पीकांची निवड करुन सुधारीत जातीचे बियाणे उपलब्ध करुन ठेवावे.<br>येत्या ५ दिवसांमध्ये दिनांक ०८ ते १२ मे, २०२१ या कालावधी दरम्यान काही/तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता पर्जन्यमानाचा अंदाज घेऊनच कापणी करावी. कापणी करणे आवश्यक असल्यास पिकाची कापणी करुन, कापणी झाल्याझाल्या पिकाची झोडणी करुन धान्य सावलीमध्ये सुरक्षित ठिकाणी वाळवावे.<br>तयार झालेल्या वायंगणी भाताची कापणी विद्यापीठाने प्रसारित केलेल्या वैभव विळ्याच्या साहायाने जमिनीलगत करावी |
| भुईमुग | काढणी | काही ठिकाणी भुईमुग पीक पक्व होण्याच्या अवस्थेत आहे. काढणीसाठी तयार झालेल्या भुईमुगाची पाने पीवळी होउन गळू लागल्यास तसेच शेंगेच्या आतील साल काळसर व शेंगदाण्यास योग्य रंग आला असल्यास काढणी करावी. काढणी केलेल्या शेंगा उन्हामध्ये ४ ते ५ दिवस वाळवून नंतर साठवणूक करावी.<br>येत्या ५ दिवसांमध्ये दिनांक ०८ ते १२ मे, २०२१ या कालावधी दरम्यान काही/तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता भुईमुगाची काढणी पर्जन्यमानाचा अंदाज घेऊनच करावी. |
| कुळीथ | काढणी | येत्या ५ दिवसांमध्ये दिनांक ०८ ते १२ मे, २०२१ या कालावधी दरम्यान काही/तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता कुळीथ पिकाची काढणी पाऊसाचा अंदाज पाहुनच करावी. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन उन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| चवळी | काढणी | येत्या ५ दिवसांमध्ये दिनांक ०८ ते १२ मे, २०२१ या कालावधी दरम्यान काही/तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता चवळी पिकाची काढणी पाऊसाचा अंदाज पाहुनच करावी. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन उन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| कडवा वाल | काढणी | येत्या ५ दिवसांमध्ये दिनांक ०८ ते १२ मे, २०२१ या कालावधी दरम्यान काही/तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता वाल पिकाची काढणी पाऊसाचा अंदाज पाहुनच करावी. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन उन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| दुभती जनावरे/ शेळ्या, मेंढ्या | - | येत्या ५ दिवसांमध्ये दिनांक ०८ व ०९ मे, २०२१ या कालावधी दरम्यान मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह काही/तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता जनावरांचे विजांपासुन संरक्षण करावे व जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. विजांचा लखलखाट होत असताना जनावरे शक्यतो झाडाखाली बांधु नयेत व ती सुरक्षित ठिकाणी गोठ्यामध्ये बांधावित.<br>विजांचा लखलखाट होत असताना व हलक्या स्वरुपाचा पाऊस सुरु असताना मोकळ्या चरावयास सोडलेल्या शेळ्यांच्या/मेंढ्यांच्या कळपासहित शेळी/मेंढपाळांनी झाडांचा आसरा घेऊ नये. झाडावर विज पडण्याची शक्यता असल्याने स्वतःच्या व जनावरांच्या जिवीतास दगा होण्याची शक्यता असते.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ थंड पाणी व उपलब्ध असल्यास खाण्यासाठी हिरव्या ओल्या चा-याची व्यवस्था करावी.<br>जनावरांचे दुपारच्या उष्णतेपासून योग्य ते संरक्षण करावे. गोठयामध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी. |
| कुक्कुटपालन | - | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता कोंबडयांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन कापडी पडदे लावून त्यावर पाणी शिंपडावे. तसेच शेडच्या छतावर गवताचे किंवा गोणपाटाचे आच्छादन घालावे व त्यावर पाणी शिंपडावे. कोंबडयांना तसेच पिल्लांना पिण्यासाठी स्वच्छ गार पाण्याचा पुरवठा करावा. |
| फळप्रक्रिया | | आंबा, कोकम, फणस, करवंद, जांभूळ इ. फळांच्या उपलब्धतेनुसार प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करावेत. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उदयानविदया महाविदयालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप च. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ऑफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवत च. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |